स.के.नं.५७३/२०२२
निशाणी क. / लगत

MHRG080011842022

सरकार वि. अदित्य जन्देल सिंग सिकरवार

फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ प्रकरण वीस अन्वये
खटला क. **५७३/२०२२** चा अभिलेख

**मा.पी.एम.माने,न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, खालापूर यांचे न्यायालयात**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अपराध घडल्याचा दिनांक | : | २०.०८.२०२२ |
| २) | अहवाल किंवा फिर्यादीचा दिनांक | : | २९.०८.२०२२ |
| ३) | फिर्याददाराचे नाव, त्यांच्या आई व बापाचे नाव, त्यांचे वय व त्यांचे निवासस्थान इ. | : | श्री. मनोज कुमार मंडल<br>वय ३२ वर्षे, धंदा–नोकरी,<br>रा. साईमंगल हाउसिंग सोसायटी, फ्लॉट नंण १६, गणेश नगर कांदिवली (वेस्ट), मुंबई |
| ४) | आरोपीचे नाव, आरोपीच्या आई व बापाचे नाव, त्यांचे वय व त्यांचे निवासस्थान इ. | : | **श्री. अदित्य जन्देल सिंग सिकरवार,**<br>वय–३०वर्षे, रा. २०३, बि विंग, आशा पाल्म सोसायटी, शिव शक्ती नगर, दावाडी, व्हिलेज, डोंबिवली, ई. ठाणे |
| ५अ.) | ज्याच्याबद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील | : | भारतीय दंड विधान संहिता कलम २७९,वमो.वा.का.कलम १८४,१३४ |

तुम्ही वर नमूद आरोपी यांनी दिनांक २०.०८.२०२२ रोजी ०८:३० वाजण्याच्या सुमारास मौजे आत्करगाव गावच्या हद्दीत पुणे–मुंबई एक्सप्रेस हायवेवर कि. मी.३८/२०० जवळ, ता.खालापूर येथे तुमच्या ताब्यातील सफारी कार क. एम.एच.०५, ई. क्यु. २५४३ हे वाहन स्वत: चालवित घेउन जात असताना मानवी जिवीत धोक्यात येईल अथवा कोणत्याही व्यक्तीला दुखापत अथवा क्षती पोहचेल इतक्या हयगयीने व बेदरकारपणे चालविली, म्हणून तुम्ही **भारतीय दंड विधान संहिता कलम २७९** प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला आहे. सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येतो.

तसेच तुम्ही वर नमूद आरोपी यांनी वर नमुद वेळी व ठिकाणी तुमचे ताब्यामधील वर नमुद वाहन हा रस्त्याच्या परिस्थितीकडे व रहदारीकडे दुर्लक्ष करुन चालवला व अपघात केला, म्हणून तुम्ही **मोटर वाहन कायदा कलम १८४** प्रमाणे

शिक्षापात्र गुन्हा केला आहे. सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येतो.

तसेच तुम्ही वर नमूद आरोपी यांनी वर नमुद वेळी व ठिकाणी अपघाताची खबर नजीकच्या पोलीस ठाण्यात न देता निघुन जाउुन **मोटर वाहन कायदा कलम १३४** चा भंग करुन **कलम १८७** प्रमाणे शिक्षेस पात्र गुन्हा केला आहे. सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येतो.

यावरून मी असा आदेश देतो की, उपरोक्त कलमांतर्गत तुमच्याविरूद्ध खटला चालविण्यात यावा.

ब. कलम व अधिनियम :— भारतीय दंड विधान कलम २७९,
व मोटर वाहन कायदा कलम १८४ आणि १३४

**आरोपीचे प्रतिकथन** :—

प्रश्न क. १ : तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय?

उत्तर : होय / ~~नाही.~~

प्रश्न क. २ : तुम्हाला आता तुमच्यावर ठेवण्यात आलेला आरोप वाचून समजावून सांगण्यात आला तो तुम्हाला समजला का?

उत्तर : होय / ~~नाही.~~

प्रश्न क. ३ : तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर : होय, मला गुन्हा कबूल आहे/ ~~नाही, मला गुन्हा कबुल नाही.~~

समक्ष

सही/-
**(पी.एम.माने)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
न्यायालय क.२,खालापूर

............सही/-............
(आरोपीची सही/अंगठा)

आरोपीला माझे समक्ष आरोपाचा तपशील त्याच्या भाषेत सुनावण्यात आला तो त्यास कबूल आहे.

सही/-
**(पी.एम.माने)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क.२,खालापूर

ठिकाण : खालापूर,
दिनांक : २९.०८.२०२२

स.के.नं.५७३/२०२२

MHRG080011842022 निशाणी क. / लगत

## न्यायनिर्णय

**(ता. २९.०८.२०२२ )**

आरोपीवर भा.द.वि. कलम २७९ व मो.वा.का.कलम १८४ आणि १८७ अन्वये गुन्हयाचा आरोप आहे. आरोपीने गुन्हा कबुल केला आहे. आरोपीकडे प्रत्यक्ष विचारणा केली. त्याने कोणत्याही दबावास अथवा मोहास बळी न पडता गुन्हा कबुल केल्याची माझी खात्री पटली. त्यामुळे, आरोपीला वरील गुन्हयासाठी दोषी धरण्यात येत आहे. मी शिक्षेच्या मुद्दयावर आरोपीचे म्हणणे ऐकले. त्याने असे सांगितले की, त्याचेवर त्याचे कुटुंबाचे पालन पोषणाची जबाबदारी आहे. त्यामुळे, त्याने कमीत कमी शिक्षा करण्याची विनंती केली. वरील परिस्थीती व गुन्हयाचे स्वरुप विचारात घेता, आरोपीला सौम्य स्वरुपाची शिक्षा करणे न्यायोचित ठरेल असे मला वाटते. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे:-

**:-आदेश-:**

| | |
|---|---|
| ०१. | आरोपी यांस भारतीय दंड विधान संहितेच्या कलम २७९, मो.वा.का.कलम १८४ आणि १८७ या गुन्हयासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ नुसार दोषी ठरविण्यात येत आहे. |
| ०२. | आरोपीला भारतीय दंड विधान संहितेच्या कलम २७९ खाली शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयाकरीता न्यायालय उठेपर्यंत साध्या कारावासाची शिक्षा सुनाविण्यात येत आहे तसेच त्याला रक्कम रु.१,०००/— (रुपये एक हजार मात्र) द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे. दंड न भरल्यास आरोपीने दहा दिवसाची साधी कैद भोगावी. |
| ०३ | आरोपीला मोटर वाहन कायदा कलम १८४ खाली शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयाकरीता न्यायालय उठेपर्यंत साध्या कारावासाची शिक्षा सुनाविण्यात येत आहे, तसेच त्याला रक्कम रु.१,०००/— (रुपये एक हजार मात्र) द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे. दंड न भरल्यास आरोपीने दहा दिवसाची साधी कैद भोगावी. |
| ०४ | आरोपीला मोटर वाहन कायदा कलम १३४ चा भंग केल्यामुळे कलम १८७ खाली शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयाकरीता न्यायालय उठेपर्यंत साध्या कारावासाची शिक्षा सुनाविण्यात येत आहे, तसेच त्याला रक्कम रु. ५००/— (रुपये पाचशे मात्र) द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे. दंड न भरल्यास आरोपीने दहा दिवसाची साधी कैद भोगावी. |
| ०५. | वरील सर्व शिक्षा एकत्रित समवर्तीत होतील. |
| ०६. | या न्यायनिर्णयाची प्रत आरोपीला विनामुल्य देण्यात यावी. |

**(न्यायनिर्णय खुले न्यायालयात घोषीत केले)**

Digitally signed by PRADIP MADAN MANE
Date: 2022.08.30 +0530

खालापूर (पी.एम.माने)
ता. २९.०८.२०२२ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्र.२, खालापूर